RNI No. MAHBIL /2012/47985
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# भाग एक-अ–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १३, अंक - ०४ ] गुरुवार ते बुधवार, मार्च ७ - १३, २०२४ / फाल्गुन १७ - २३, शके १९४५ [ पृष्ठे ०२

## प्राधिकृत प्रकाशन

### जिल्हाधिकारी यांजकडून

### अधिसूचना

क्रमांक नवि-७/कावि-१५५/२०२४.— महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३४१-ब-२ चे पोट-कलम ४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, कुमार आशीर्वाद, जिल्हाधिकारी, सोलापूर, या प्रकटनाद्वारे असे जाहीर करतो की, सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस नगरपंचायतीमध्ये दिनांक २६ फेब्रुवारी २०२४ रोजी घेण्यात आलेल्या विशेष सभेमध्ये परिशिष्टात नोंद केलेले उपाध्यक्ष म्हणून निवडून आले आहेत.

**परिशिष्ट**

| अ.क्र. | नगरपंचायतीचे नाव | निवडून आलेल्या उपाध्यक्षाचे नाव | शेरा (जर उपाध्यक्षाचे पद राखीव असेल तर कोणासाठी) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | माळशिरस | कोमल वैभव जानकर | -- |

**कुमार आशीर्वाद,**
(भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी, सोलापूर.

सोलापूर, १ मार्च २०२४.

---

### BY COLLECTOR

### Notification

No. नवि-७/कावि-१५५/२०२४.– In exercise of the powers vested under sub-section 4, Section 341-B-2 of The Maharashtra Municipal Councils, Nagarpanchayats and Industrial Townships Act, 1965.

I, Kumar Aashirwad, Collector, Solapur, hereby publish the name of the person who have been declared elected as Vice-President of the Malshiras Nagarpanchayat of Solapur District from the Nagarpanchayat shown against their name in the Special Meeting held on 26th February 2024.

**Schedule**

| Sr. No. | Name of the Nagarpanchayat | Name of the Vice-President | Remark (Whether the seat is reserved and if so, for Whom) |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | Malshiras | Komal Vaibhav Jankar | -- |

**KUMAR AASHIRWAD,**
(I.A.S.)
Collector, Solapur.

Solapur, 1st March 2024.

---

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांजकडून**
**जिल्हा परिषद, सातारा**

**अधिसूचना**

क्रमांक साप्रवि/नियो-१/वाप्रअ-४८१/२०२४.— महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १४२ चे आधारे महाराष्ट्र राज्य शासनाचे ग्रामीण विकास विभागाकडील क्रमांक झेडपीआर-४७६३/४०४८६/पी, दिनांक ४ सप्टेंबर १९६४ ने ठरवून दिलेल्या व पुन्हा क्रमांक झेडपीआर-४७६६/३२३९३/पी, दिनांक ३ नोव्हेंबर १९६६ ने सुधारणा करून दिलेल्या, तसेच महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाचे पत्र क्रमांक एएआर-१०७९-(६७६)-२६, दिनांक १२ नोव्हेंबर १९८१ ने पुन्हा सुधारून ठरवून दिलेल्या नियमानुसार सातारा जिल्हा परिषदेचा सन २०२२-२३ सालचा वार्षिक प्रशासन अहवाल तयार करून प्रसिद्ध करणेत येत आहे.

सन २०२२-२३ या वर्षाचा वार्षिक प्रशासन अहवाल नियमाप्रमाणे तयार करून सातारा जिल्हा परिषदेच्या दिनांक ९ जानेवारी २०२४ रोजी झालेल्या ठराव समिती सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता, त्यास जिल्हा परिषद ठराव क्रमांक ६८७ अन्वये मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (वार्षिक प्रशासन अहवाल प्रसिद्ध करणे) नियम १९६४ च्या नियम ९ अन्वये सदर अहवाल प्रसिद्ध झाला, असे या अधिसूचनेद्वारे जाहीर करण्यात येत आहे.

**महादेव घुले,**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सातारा.

सातारा, ४ मार्च २०२४.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.